# अण्णा भाऊ साठे आणि मातंग समाज

**श्री. बा. रा. वाघमारे,**

**संस्थापक,**

**अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्स**

अण्णा भाऊ साठे आणि मातंग समाज असं शिर्षक वापरुन मी काही अण्णा भाऊ साठेंना जातीत बंदीस्त करू इच्छित नाही. तसं कोणी करतो म्हटलं तरी त्याला ते शक्य नाही. कारण अण्णा भाऊ साठे म्हणजे सातासमुद्रापलिकडे गेलेलं एक महान व्यक्तिमत्व आहे. त्यामुळे जातीशी त्यांचा संबंध दर्शवणं म्हणजे एक प्रकारे त्यांच्या विचारापासून दूर जाणे होय. अण्णा भाऊ साठेंनी कधीही जातीचं भांडवल केलं नाही. त्यांनी काही मातंग समाजासाठीच लिहिलं नाही. तर ते एक थोर लेखक आहेत. त्यांनी जगभरातल्या दलित – शोषित - पीडित – वंचित - कामगार लोकांसाठी लिहिलं आहे. दुसरं म्हणजे इथला कोणताही राजकीय पक्ष मातंग समाजाच्या माणसाला कधीही मोठं होवू देत नाही. एखाद्या गावासाठी किंवा एखाद्या पक्षासाठी मातंग समाजाच्या कार्यकर्त्यांनं आपला सारा जीव आटवला असला तरीही त्याच्या बाबतीत तो त्या गावातला किंवा त्या पार्टीतला एक मोठा कार्यकर्ता आहे. असं मात्र कधीच म्हटलं जात नाही. उलट त्याची ओळख करून देताना मातंग समाजाचा कार्यकर्ता असं म्हणूनच करून दिली जाते. आणि तिकडे मात्र त्यांच्यातला बेअकली जरी कार्यकर्ता असला तरीही गावातला एक प्रतिष्ठित कार्यकर्ता म्हणून त्याची ओळख निर्माण करून दिली जात असते. त्यामुळं त्याच्या नावासमोर त्याची जात जोडण्याची त्यांना कोणतीही गरज नसते. हा रोग तसा फार पूर्वीपासूनच या देशात आहे. गोरा कुंभार - सावता माळी - चोख्या महार असं म्हटलं जातं. परंतू ज्ञानोबा ब्राह्मण असं मात्र कधीही म्हटलं जात नाही. उलट त्याला माऊली म्हटलं जातं. गोरोबा माऊली, चोखोबा माऊली असं म्हटलं तर यांच्या बापाचं काही बिघडणार आहे काय? पण तसं ते कधीही म्हणणार नाहीत. या

देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना देखील दलितांचे नेते म्हणण्या मागचा हाच उद्देश होता. अण्णा भाऊ साठे यांच्या बाबतीत देखील त्यांचं तेच धोरण आहे. त्यामुळे अण्णा भाऊंना जातीत बंदिस्त करणं म्हणजे जातीयवाद्यांना मदत करणे होय. त्यामुळे मी काही ते पाप करणार नाही. परंतू दुसरी शोकांतिका ही आहे की, इथ प्रत्येकाला आपली जात प्यारी झाली आहे. रविदासांची जयंती चर्मकार लोकंच करतात. शिवाजी महाराजांची जयंती मराठा जातीचे लोकंच करतात. अण्णा भाऊंची जयंती मातंग समाजाचे लोकंच साजरी करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबतीत मात्र थोडसं वेगळं आहे. कारण त्यांची जयंती देशातल्या प्रत्येक राज्यात साजरी होत असते. परदेशात साजरी होत असते. तिथं काही बाबासाहेबांच्या जातीचे लोकं नसतात. बहूजन चळवळीला दिलासा देणारी ही एक फार मोठी गोष्ट आहे. त्यामुळे कोणती जात कोणत्या महापुरुषाला मानते. हा विषय काही महत्त्वाचा नाही. तर त्या-त्या महापुरुषाच्या विचारावर ती ती जात उभं राहणं जास्त महत्वाचं आहे. म्हणून अण्णा भाऊ साठे आणि मातंग समाज असं जे काही लेखाच शिर्षक आपण वापरलं आहे. ते काही फारसं चुकीचं आहे असं निदान मला तरी वाटत नाही .

मातंग समाज अण्णा भाऊ साठे यांची जयंती साजरी करतो. ही गोष्ट जेवढी खरी आहे, तेवढीचं ही गोष्ट खरी आहे की, मातंग समाज हा अण्णा भाऊ साठेंचा विचारच आचरणात आणत नाही. म्हणून मग अण्णा भाऊ साठे यांचा विचार मातंग समाजाने नाकारला का?... अजिबात नाही. म्हणून जसा तो नाकारला नाही तसा तो विचार स्वीकारला देखील नाही. फुले-आंबेडकर तर दूरच राहिले, परंतु त्यांच्याही आधी या देशात मातंग समाजाचे लहुजी साळवे होऊन गेले मुक्ता साळवे होऊन गेली. त्यांचं देखील या समाजानं कधी ऐकलं नाही. मग मातंग समाज असं का वागतो?.... तो वेडा आहे काय?.... त्याला जर मी वेडा म्हणू तर कोणतीही गोष्ट त्याला सांगा, त्याच्या पुढची तो दुसरी एखादी भलतीच गोष्ट सांगून टाकतो. एखाद्याचा शहाणा म्हणून या विषयी काही सल्ला मागितला तर तो तिसरेच काहीतरी सांगून त्यात आणखी गुंताच निर्माण करेल, परंतु आपण एकत्र बसून त्यातून

काही मार्ग काढू. असं मात्र तो कधीच म्हणणार नाही. चौथा एखादा मध्येच येतो आणि इथं असं झालं पाहिजे होतं आणि तिथं तसं झालं पाहिजे होतं असं उगीचच काहीतरी सांगत असतो. बरं तो एवढ्यावरच थांबत नाही. तर चक्क सर्वच कार्यकर्त्यांना तो मूर्खात काढत असतो. सब घोडे बारा टक्के याच नजरेनं तो प्रत्येकाकडं बघत असतो. समाजात वावरत असताना प्रत्यक्षात कार्यकर्त्यांसमोर काही अडचणी असू शकतात, याचा मात्र तो कधीच विचार करत नाही. म्हणून कोणत्या वेळी कोणता मांग काय म्हणेल, याचा काही नेम नसतो. तो आपला मांग मसळा कधीच सरू देत नसतो. शहाणाही तसाच आणि वेडा ही तसाच. त्यामुळे या समाजाचं सगळं वाटोळं होऊन गेलं आहे. हा समाज 100% अण्णा भाऊ साठेंचा अनुयायी आहे, त्याबद्दल तिळमात्र शंका नाही. परंतु शोकांतिका ही की, हा अनुयायी 100% आंधळा आहे. एक आंधळा दुसऱ्या आंधळ्याला जसा रस्ता दाखवू शकत नाही, नेमकं तसंच काहीसं हे झालं आहे. अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती मध्ये कोणत्या राजकीय पार्टीचे लोकं बोलवायचे यावरून समाजात गावोगावी गटं तटं पडले आहेत. ही गोष्ट समाजातल्या विचारवंतांना दिसत नाही काय ?... या गर्तेतून समाजाला बाहेर काढण्याची त्यांची काही जबाबदारी नाही काय? परंतु ही लोकं कोणतीच रिस्क घेऊ शकत नाहीत. ह्यांना कोणी फासावर चढवणार आहे काय?... भर सभेत अण्णा भाऊ साठेंची हे लोकं कुतरओढ करीत असतात. कोणी अण्णा भाऊ साठे मार्क्सवादी होते असं सांगतात, तर कोणी ते आंबेडकर वादी होते असे सांगतात. पण या वादाचा समाजावर काय परिणाम होतो माहीत नाही. परंतु या वादावादीमुळ गावातला जो कोणी पाटीलकीच्या थाटातला माणूस त्या सभेचा अध्यक्ष असतो, त्याची मात्र खूप मोठी करमणूक होत असते. कार्यक्रम घेणाऱ्याबदल काय बोलावं ?... कार्यक्रम घेऊन त्याचा तो मोकळा झालेला असतो. ना तो मार्क्सवादी असतो, ना तो आंबेडकर वादी असतो. तो तर हिंदुत्ववादी असतो. जयंतीत तो काय कमावतो आणि काय गमावतो?.... हे त्याच त्यालाच माहीत. परंतु परिवर्तनवादी विचार घेऊन चालणारा जो कोणी कार्यकर्ता असतो, त्याच्या हातात मात्र जयंतीचा कारभार हा कधीच जाऊ देत नाही.

खरं सांगू का? ज्याचे गुडघे फुटतात तेच खरे बाप असतात. ज्याचे गुडघे कधी फुटत नसतात त्यानं बाप म्हणून मिरवू नये, या निमित्यानं माझं एवढंच एक म्हणणं आहे.

मातंग समाजातला प्रत्येक कार्यकर्ता हा कोणत्या ना कोणत्या राजकीय पक्षांमध्ये काम करत असतो. परंतु शोकांतिका ही आहे की, एक राजकीय कार्यकर्ता म्हणून त्याच्याकडं कोणतंही राजकीय धोरण नाही. केवळ एक रोजगाराचं साधन म्हणून अथवा त्यांची ती एक व्यक्तिगत गरज म्हणून तो राजकारण करत असतो. गाई मागून वासरू, घोड्या मागून शिंगरु जसं चालतं नेमकं तसंच काहीसं याचं असतं. त्याच्या राजकारणाचं स्वरूप म्हणजे 'मान ना मान मै तेरा मेहमान' असंच असतं. पक्षपातळीवर त्याच्याकडे कोणतंही महत्वाचं पद नसतं. निर्णय प्रक्रियेत त्याला कवडीचीही किंमत नसते. मग तो काँग्रेसमध्ये काम करणारा राहो की, भाजप - सेनेमध्ये काम करणार राहो. एक राजकारण म्हणून तो कधीही इथल्या संसदीय शासन प्रणाली वर बोलताना दिसत नाही. या देशात लहुजी साळवे यांनी जे काही स्वाभिमानाचं राजकारण केलं यावर तो कोणतंही भाष्य करीत नाही. केवळ साहेब, साहेबाची बायको, साहेबाची गाडी, आणि साहेबाची घोडी एवढ्याच काय तो राजकारण म्हणून त्याच्याकडे चर्चेचा विषय असतो. इकडं हे अस आहे तर तिकडं बीएसपी किंवा वंचित आघाडीत काम करणाऱ्या मांगाची एक वेगळीच भानगड आहे. काशीरामांनी हे केलं आणि बाळासाहेबांनी ते केलं. असं सांगून ते सहज मोकळं होतात. परंतु त्या पक्षांमध्ये असं एक एकटं जाण्यापेक्षा अख्ख्या समाजालाचं घेऊन जावं, असं मात्र ते कधीच म्हणणार नाहीत. कदाचित हे काम तेवढं सोपं नाही. हे त्यांना कळून चुकलं असावं. काहीजण तर धड इकडचेही नाहीत ना धड तिकडचेही नाहीत. त्यामुळं जसं जमलं तसं ते दोन्ही कडूनही वाजवतात. मी काही राजकीय कार्यकर्ता नाही. म्हणून इतरांनीही राजकारण करू नये, असं मात्र मी कधीच म्हणणार नाही. इथं आपल्या राजकीय कार्यकर्त्यांना अनेक जण स्वार्थी म्हणतात, लाचार म्हणतात. कोणी कोणी तर त्यांना चक्क चमचे म्हणतात. तसं मी काही त्यांना म्हणू शकणार नाही. त्यांच्याकडे मी त्यांच्या कामाचा जमा खर्च मागणार नाही. परंतु

त्यांच्या या वागण्यामुळे समाजाचं फार मोठं नुकसान झालेलं आहे. याची नुकसान भरपाई मी कोणाकडे मागू? ..... सध्या महाराष्ट्रात तीन पाट्र्यांचं सरकार आहे. त्या सरकारमध्ये बौद्ध समाजाचे तीन माणसं मंत्री आहेत. तिथं मातंग समाजाचा एकही मंत्री नाही. केंद्र सरकार मध्ये देखील मातंग समाजाचा कोणीही मंत्री नाही. समाजाचा एक घटक म्हणून हा प्रश्न मी कोणाला विचारावा?.... इथल्या कोणत्याही राजकीय पक्षानं आतापर्यंत मातंग समाजाचा एकही माणूस राज्यसभेवर घेतला नाही कोण्या विधान परिषदेवर घेतला नाही. एकही मांग या देशात राष्ट्रपती नियुक्त खासदार झाला नाही किंवा राजपाल नियुक्त एखादा आमदार झाला नाही याचा जाब मी कोणाला विचारू?.... हा एक फार मोठा अवघड प्रश्न आहे.

अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्सच्या माध्यमातून समाजात वावरताना काही अनुभव माझ्या वाट्याला आलेले आहेत. त्यातला एक सांगण्यासारखा अनुभव म्हणजे, मातंग समाज काही सुधारणार नाही, असं अनेकजण म्हणू लागले आहेत. त्यांना मी एवढंच म्हणतो की, हा समाज सुधारला पाहिजे याच्यासाठी तुम्ही काय केलं ते सांगा?..... यावर मात्र त्यांच्याकडे कोणतंही उत्तर नाही. रोज एका गावात ध्या दिवसा मांगाच्या माणसाला मारलं जात आहे. मग काय?.... मार खाण्याची फार हौस आहे म्हणून मातंग समाजाचा माणूस रोज एका गावात मार खातो काय?..... परंतु खरं दुखणं हे आहे की, समाजानं आपल्या पाठीशी राहिलं पाहिजे, असं अनेकांना वाटत असतं. परंतु समाज पाठीशी राहायला पाहिजे, यासाठी जे काही कष्ट घ्यावे घ्यावे लागतात, त्यासाठी मात्र त्याची कोणतीही तयारी नसते. कार्यकर्ता होण्याची लायकी असो अथवा नसो, याचा मात्र त्यांना थोडासाही विचार नसतो. काही मिळत असेल तर समाजाचं काम कराव. आणि जर का मग काही मिळत नसेल तर मग समाजाचं काम काय म्हणून करावं?... हा प्रश्न देखील तोच उपस्थित करतो. त्याला आणखी चिडवले तर मग तो म्हणतो की, समाजासाठी आपल्या लेकरा-बाळांना उपाशी मारावं काय? मग काय तोडून खावं काय?....

खरं तरं मातंग समाज हा अनेकांना मदत करीत आला आहे. त्यामुळे समाज आता कोणावर विश्वास ठेवायला तयार नाही. समाज माझ्याकडून काय अपेक्षा करतो आहे माहित नाही परंतु एक कार्यकर्ता म्हणून जी जी गोष्ट मी समाजाला सांगतो आहे. ती ती गोष्ट समाज माझ ऐकतो आहे. खरंच आपलं देखील काही अस्तित्व या देशात असलं पाहिजे, असं म्हणतो आहे. ध्येय तर माझं फार मोठं भव्यदिव्य आहे. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, “चळवळीत कुठलाही शॉर्टकट नसतो,” म्हणून चळवळीसाठी जेवढा काही लागणारा नैसर्गिक वेळ असतो, तेवढा तो लागणारच असतो, माझ्याआधी समाजात जे काही काम करणारे कार्यकर्ते होते. त्या काळात मांगवाड्यात घरापरत देवकरण्या होत्या. त्यांचं हे देवपण समाजातून निघून जावं. यासाठी त्यावेळच्या कार्यकर्त्यांनी मनावर घेतलं, त्या कामाचा ध्यास घेतला. त्याचा परिणाम असा झाला की, समाजात आज नवीन मुलींमध्ये शोधून देखील एकही देवकरिण सापडणार नाही. मांगानी देव – धर्म सोडून देणं ही काय मामुली गोष्ट होती काय?... परंतु शोकांतिका ही की, मातंग चळवळीला कोणी भाष्यकार मिळाला नाही. त्यामुळे हा घडून आलेला बदल म्हणावा तेवढा क्रांतिकारक वाटला नाही. परंतु मातंग समाज देखील बदलू शकतो. देवधर्म फेकून देऊ शकतो, हे एक नवं सत्य समोर आलं हे देखील काही कमी नाही. काहींनी सांगितलं मांग बाजा बंद करा. आणि तो बंद झाला. तर मी सांगत होतो की, समाज माझं ऐकतो आहे. आणि हे बघून काहीजण भयंकर जळू लागले आहेत. आणि चिमटे घेऊन हळूच एखाद्याला सांगू लागले आहेत की, ‘माणसानं आधी आपलं आपलं सुधारलं पाहिजे, त्याचं बघून मग समाज सुधरत असतो.’ मग यावर लोककवी वामनदादा कर्डक यांच्या भाषेत मी त्यांना जाहीरपणे विचारतो की, “बार मध्ये रोजच खातोस कोंबड्याचे पाय, पण समाजाचं काय?... तुमचे धंदे तरी काय आहेत ते सांगा ना?... निदान ते धंदे मी समाजाला सांगू शकेल. कोणाला श्रीमंती नको आहे?.... तुमच्याकडे हे सगळं काही कुठून येतं?... यावर मग मात्र त्यांच्याकडे कोणतंच उत्तर नसतं, म्हणून माझं समाजासमोर खुलं सांगणं आहे की, बसल्याजागी चिमटे

घेणं बंद करा, मातंग समाज हा भोळा भाबडा समाज आहे, गरीब समाज आहे, अडाणी समाज आहे. ज्याला कार्यकर्ता व्हायचे आहे, त्याला या समाजात काम करण्याची फार मोठी संधी आहे. परंतु हे ज्याला कळत नाही त्याला मी काय करू शकतो?.... माझ्यापेक्षा समाजात शिकलेले लोकं खूप आहेत. पैसे वाले देखील खूप आहेत. घेऊन जा ना समाज पाठीमागं, माझ्या बापाचं काय जाणार आहे.. जर तसा कोणी दिसला तर त्याच्या चरणावर माथा टेकवणारा पहिला माणूस मीचं असेल.

समाजावर कुठ अत्याचार झाला असेल तर त्या ठिकाणी मी काही फारसं धावून जात नाही. किती ठिकाणी म्हणून धावत जाऊ?.... एक कार्यकर्ता म्हणून समाजात काम करण्याची माझी पद्धत थोडीशी वेगळी आहे. अन्याय झाला तिथं धावून जाण्यापेक्षा या समाजावर कोणी अन्यायच करणार नाही. याच्यासाठी मी काम करतो आहे. समाजातील माझे एक प्राध्यापक मित्र आहेत त्यांनी मला एकदा सांगितलं की, "कोणत्यातरी राजकीय पार्टीचं पाठबळ घेतल्याशिवाय कोणतंही संघटन वाढूच शकत नाही. त्यामुळे अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्सला पाठबळ देणारी एखादी पार्टी निवडा" त्यांना मी म्हटलं की, अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्स नाही वाढली तरी चालेल, परंतु मी कोणत्याही राजकीय पक्षाचं पाठबळ घेणार नाही. एक प्राध्यापक म्हणून एवढंच करा की, अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्स ही संघटना कोणत्याही राजकीय पक्षाशी बांधील नाही, असं समाजासमोर जाऊन सांगा. परंतु त्यांनी आणखी तसं काही केलं नाही. इथं प्रत्येकाला राजकीय स्वातंत्र आहे. मग माझ्यावर कोण बंधनं घालणार आहे. परंतु माझी मीच माझ्यावर काही बंधनं घालून घेतलेली आहेत. कालच्या लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळेस बी एम पी कडून मला निवडणूक लढवण्याची एका कार्यकर्त्याकडून मला ऑफर आली होती. तरीही मी लोकसभेची निवडणूक लढवली नाही. नांदेडच्या पीपल्स कॉलेजमध्ये चर्मकार समाज समन्वय समितीच्या वतीने मागे एक कार्यक्रम ठेवण्यात आला होता. तिथला प्रत्येक वक्ता हा कांशीरामांचं स्वप्न साकार करण्याच्या संदर्भात बोलत होता. तिथं बोलताना मी सांगितलं की, "कांशीरामांचं स्वप्न

साकार करण्यासाठी एक प्रमुख कार्यकर्ता लागतो. तो कसा असला पाहिजे ते आधी मला सांगा, ती लायकी माझ्यात नसेल तर नैतिक दृष्ट्या बोलण्याचा मला अधिकारच राहणार नाही. आणि जर का मग ती लायकी माझ्यात असेल तर चळवळीसाठी लागणारी साधनं मला द्या, मी बघतो कांशीरामांचं स्वप्न महाराष्ट्रात कसं साकार होणार नाही ते" यावर स्टेज वरच्या सर्व मान्यवरांनी, संयोजकांनी या प्रस्तावावर निश्चितच विचार करू असं सांगितलं. परंतु नंतर त्यांचा काय विचार ठरला, तो अजूनही माहिती नाही. तर असो, मी राजकारण तर करणार नाहीच आणि यदाकदाचित राजकीय भूमिका घेतलीच तर मग माझं राजकरण कुठल्या दिशेने जाणार आहे . ही गोष्ट इथं आपल्या ध्यानात नक्कीच आली असेल.

मुंबई विद्यापीठास अण्णा भाऊ साठे यांचे नाव देण्यात यावे, या मागणीच्या संदर्भात जनजागृती करत मराठवाड्यात मी फिरलो आहे. कोणत्याही गावात जा, एकही माणूस तुम्हाला दिसणार नाही. ऊस तोडणीच्या कामाला, वीट भट्टीच्या कामाला, समाज पोटासाठी भटकत आहे. त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचं काय?.... यावर विचार करायला कोणाकडे वेळ आहे काय?.... दीक्षाभूमीवर किंवा चैतन्य भूमी वर बौद्ध लोक लाखोंच्या संख्येने एकत्र जमतात. तसं कुठेतरी मातंग समाज एकत्र येऊन, आपली शक्ती जगाला दाखवणार आहे का?.... याचा आम्हाला कुठेतरी विचार करावा लागणार आहे. प्रा. अशोक जाधव सरांनी या पुस्तकाच्या माध्यमातून ही जी काही विचार मांडण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. आणि प्रा. डॉ. नामदेव वाघमारे यांच्या सांगण्यावरून मनातल्या भावना व्यक्त करता आल्या, त्यामुळे या उभयतांचे आभार मानल्यावाचून राहवत नाही. खरंच अण्णा भाऊ साठे जन्म शताब्दी वर्ष म्हणजे मातंग समाजासाठी एक भाग्यशाली वर्ष आहे. कारण शंभर वर्षात जेवढं प्रबोधन झालं नाही, तेवढं समाज प्रबोधन या वर्षभरात घडणार आहे. आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार राजा झाले यांचे निर्वाण झालं. त्यांनी दोन वर्षांपूर्वी मला सांगितलं होतं की, "अण्णा भाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षाला अजून दोन वर्षे बाकी आहेत. आतापासूनच हे जन्मशताब्दी वर्ष साजरं करण्यासाठी प्रयत्न करा. समाजाचे हे प्रयत्न बघून

मग सरकार देखील तेवढ्याच मोठ्या प्रमाणात हे जन्म शताब्दी वर्ष साजरं करेल. परंतु राजा ढाले यांच्या अपेक्षेप्रमाणे आम्हाला प्रयत्न करता आले नाहीत. याची खंत मला अजन्म राहणार आहे. या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने कार्यकर्त्यांनी आपल्या मनातला द्वेष काढून टाकला पाहिजे. एक आंबा म्हणतो, तर एक चिंच म्हणतो, हे कुठंतरी थांबलं पाहिजे. कोणाच्याही मागे जाऊन काही मिळणार नाही. बिलवरी या कथेतील अण्णा भाऊ साठेंची नायिका तमाशाचा फड चालवून 200 माणसांना जगवत होती काही मातब्बर तिला वाडे बांधून द्यायला तयार होते , काहींनी जमिनीची बक्षीस पत्र तयार ठेवली होती. परंतु बिलवरी त्या मोहाला बळी पडली नाही. कुठल्याही परिस्थितीत तिने आपला स्वाभिमान विकला नाही. यातून आम्ही काही शिकणार आहोत की नाही?.... शाहीर अमर शेख हा अण्णा भाऊ साठेंचा एक सच्चा दोस्त होता, तसा एखादा सच्चा मुसलमान दोस्त आम्हाला मिळेल काय?.... सत्तू भोसले फकिराचा दोस्त होता. तसा एखादा दोस्त मराठा समाजातून आम्हाला कोणी मिळेल काय?.... विष्णू पंत कुलकर्णी सारखा एखादा ब्राम्हण आम्हाला मिळेल काय ?.... याचा मी शोध घेतो आहे. आणि या कामी मला समाजातील प्रत्येक माणसाची मला गरज आहे.

लहुजी साळवेंनी ज्या पद्धतीनं उमाजी नाईकांच्या च्या माध्यमातून कोळी, भिल्ल, रामोशी, मांग, महार, चांभार, लोहार, सुतार, यांना सोबत घेऊन एक राजकीय लढा उभा केला. नेमकं तसंच मी काही करू पाहतो आहे. अण्णा भाऊ साठेनी देखिल सांगून ठेवलं आहे की, "बोलवा त्या सकलांना, साऱ्या जहालांना, सोशालिस्टाना, शेकापवाल्यांना, दलितांच्या विविध पक्षांना, आणि त्याचबरोबर साऱ्या लोकशाहीवाद्याना या साऱ्यांच्या एकजुटीचा रथ करा आणि त्या रथावर स्वार होऊन चालत राहा." अण्णा भाऊ साठेंचा हा संदेश ऐकून कोणी उतावीळ होऊ नये, एवढंच माझं म्हणणं आहे. नाही तर आपल्या समाजातल्या लोकांना एक फार वंगळी सवय लागलेली आहे. लातूरच्या एका सभेत मी सहजच बोललो होतो की, "मातंग समाज भविष्यात सत्ताधारी बनू शकतो," तर लगेच एकानं सत्ता संपादन मेळावा

घेऊन, स्वतःचं हसं करून घेतलं, सिडकोच्या एका कार्यक्रमात मी बोललो होतो की, “मातंग समाजातील नवीन पोरांना आता आपणही या देशात बंद पाळावा असं वाटू लागलं आहे,” मी असं बोलल्या बरोबर काही हौशी लोकांनी भारत बंदची हाकं देऊन स्वत:चं सोंग करून घेतलं. म्हणून असं वागणं समाजासाठी घातक ठरणार आहे. याचं भान आम्ही ठेवलं पाहीजे, एवढंच या ठिकाणी सांगून थांबतो.